 सं.फौ.ख.क्र.४१७/२०२२

निशाणी क्र.०६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५**
मी देवाशपथ खरे सांगतो की

नाव :- संतोष बबन हलकारी.,
वय :- ४५ वर्षे, धंदा - शेती
रा :- सातकोर, ता. विक्रमगड, जि. पालघर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.ल.मो.पाडवी.**

१. घटना ही दि.०१.०१.२०२२ रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास सजण येथे घडली होती. मला घटनेच्या वेळेस अरुण गुणगुणा यांनी फोन करुन सांगितले होते की, विक्रमगड येथे त्यांचा अपघात झालेला आहे. सदर अपघातात त्यांच्या कानाला व खांदयावर मार लागले होते. त्यांना विक्रमगड येथील दवाखान्यातुन वेदांत हॉस्पीटल धुंदलवाडी येथे उपचाराकरिता पाठविले होते. सदर अपघात हा एक मोटार सायकल व तवेरा गाडीमध्ये झालेले होते. सदर अपघातात तवेरा चालकाची चुक होती. पोलीसांनी सदर घटनेबाबत माझ्याकडे चौकशी करुन माझे जबाब नोंदविले नव्हते. तवेरा चालकाचे नाव मला सांगता येणार नाही.
सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. मेतकर**

२. अरुण गुणगुणा हे माझे साडु लागतात. अपघातात अरुण गुणगुणा यांना जखम झाली होती म्हणुन मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघातात कोणाची चुक होती कोणती गाडी कोणत्या दिशेने आली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी तवेरा गाडी चालकाविरुध्द केस केल्यामुळे मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेले संपुर्ण मजकुर खोटे सांगितले.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

16/3/26

(एम. पी. मथुरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
जव्हार.

दिनांकः-१६/०३/२०२६.